**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स बबनरावजी शिंदे शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, गट नंबर १६०, मुक्काम पोस्ट-तुर्कपिंपरी, तालुका-बार्शी, जिल्हा – सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरुन १२,०००.० मे. टन प्रतिदिन ( ७,०००.० मे. टन प्रतिदिनने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प २५.० मेगा वॅट वरुन ६०.० मेगा वॅट (३५.० मेगा वॅटने वाढ), तसेच मळीवर आधारित मोलॅसिस (बी व सी) / केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ६०.० किलोलिटर प्रतिदिनवरुन २००.० किलोलिटर प्रति दिन (१४०.० किलोलिटर प्रति दिनने वाढ) करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत - -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स बबनरावजी शिंदे शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, गट नंबर १६०, मुक्काम पोस्ट-तुर्कपिंपरी, तालुका-बार्शी, जिल्हा – सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरुन १२,०००.० मे. टन प्रतिदिन ( ७,०००.० मे. टन प्रतिदिनने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प २५.० मेगा वॅट वरुन ६०.० मेगा वॅट (३५.० मेगा वॅटने वाढ), तसेच मळीवर आधारित मोलॅसिस (बी व सी) / केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ६०.० किलोलिटर प्रतिदिनवरुन २००.० किलोलिटर प्रति दिन (१४०.० किलोलिटर प्रति दिनने वाढ) करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, **दिनांक ०७ फेब्रुवारी , २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता** प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री निखिल जालिंदर मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था,



निखिलमोरे

चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

सदस्य, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना करण्यात येत आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मेसर्स बबनरावजी शिंदे शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, गट नंबर १६०, मुक्काम पोस्ट-तुर्कपिंपरी, तालुका-बार्शी, जिल्हा – सोलापूर, महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरुन १२,०००.० मे. टन प्रतिदिन ( ७,०००.० मे. टन प्रतिदिनने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प २५.० मेगा वॅट वरुन ६०.० मेगा वॅट (३५.० मेगा वॅटने वाढ), तसेच मळीवर आधारित मोलॅसिस (बी व सी) / केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ६०.० किलोलिटर प्रतिदिनवरुन २००.० किलोलिटर प्रति दिन (१४०.० किलोलिटर प्रति दिनने वाढ) करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए आसवणी - ५ (जी), साखर उद्योग - ५ (जे), मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक -०८/०४/२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १९/०४/२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रत्यक्ष पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास मंगळवार, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी १२. ३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-०५ / २०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०११९- एफटीएस ०१४३ दिनांक १९-०१-२०२३ अन्वये



डिसोमोरे

खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, सोलापूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | -सदस्य |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सोलापूर | - आयोजक |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र संचार यात **मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना** दिनांक ०५-०१-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-बार्शी, तालुका- बार्शी, जिल्हा- सोलापूर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- बार्शी, तालुका- बार्शी, जिल्हा- सोलापूर,



२

७) ग्रामपंचायत कार्यालय - मौजे- तुर्कपिंपरी, हाटकरवाडी, कापशेवाडी, मानेगांव, चव्हाणवाडी, उंदरगाव, केवाड, जामगांव, मालवंडी, जिल्हा- सोलापूर,

८) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

९) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-पुणे , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, ३ रा मजला, जुना पुणे - मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बळी बिल्डिंग, सिव्हिल लईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३

१२) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी लेखी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी प्रकल्पाविषयी ०५ लेखी सुचना/हरकती/टिप्पणी/तक्रार प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात, असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद

घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च ४९८ कोटी खर्च येणार असून तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च - रुपये ३६३५ लाख, तर आवर्ती खर्च - रुपये ३५० लाख रुपये आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण-झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून बॉयलरला ७० मीटर उंचीची चिमणी लावण्यात येईल. त्यास ईएसपी हे उपकरण लावण्यात येईल.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

**१) श्री. धनाजी विष्णु धुमाळ, राहणार - तुर्कपिंपरी जामगांव मध्ये वस्ती, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूर:-**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पास लागणारा कच्चा माल आपण कशा प्रकारे उपलब्ध करणार आहात? | साखर कारखान्यासाठी कच्चा माल म्हणजे ऊस लागतो. तो परिसरातील स्थानिक शेतक-यांकडूनच घेण्यात येईल. ऊसाचे गाळप झाल्यानंतर मोलॅसिस (मळी) तयार होते. ती मळी ही आसवणी प्रकल्पात वापरली जाईल. साखर कारखान्यात ऊसाच्या गाळपानंतर जो बगॅस राहिल, तो सहविद्युत निर्मिती प्रकल्पात कच्चा माल म्हणून वापरण्यात येईल. म्हणजे या प्रकल्पात ऊस हाच कच्चा माल राहिल. तोच आसवणी प्रकल्प व सहविद्युत प्रकल्पासाठी वापरला जाईल. |
| २) | प्रकल्पात हरितपट्टा विकसित करताना कुठल्या प्रकारची झाडे लावण्यात येणार? | पूर्वी हरितपट्टा विकसित करण्याची सजगता नव्हती. मात्र २०१५-१६ ला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने एक सुधारित यादी प्रसिध्द केली की, ती पूर्वी २००० प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार काही जंगली झाडे |



स्मिता मोरे

| | | |
|---|---|---|
| | | आणि जांभुळ, पळस, वड. पिंपळ, आंबा अशी झाडे की ती पर्यावरणीय पुरक/महत्वाची आहेत. पावसाळ्याच्या हंगामात ती लावण्यात येतील. नियमाप्रमाणे ३३% हरितपट्टा विकसित करावाच लागतो. त्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. |

**२) श्री. कुमार शिंदे, मुक्काम पोस्ट-दारफळ, तालुका-माढा,जिल्हा-सोलापूरः-**

| **अ.क्र.** | **सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | प्रकल्प विस्तारिकरण करताना उत्पादन प्रकियेत उत्पन्न होणा-या सांडपाण्याची गुणवत्ता काय असेल व त्याचा परिणाम काय होईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, प्रकल्पात दोन विभागात सांडपाणी उत्पन्न होईल- साखर उत्पादन विभाग आणि आसवणी विभाग. साखर उत्पादनात ऊस गाळप १.० टन केल्यास ७-८ लीटर सांडपाणी उत्पन्न होईल. त्याची गुणवत्ता ही पारित पॅरॅमिटर मानकांमध्ये मोजली जाते. आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पात Online Continuous Monitoring System - ऑनलाईन सतत मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आलेली आहे. त्याचे एक कनेक्शन हे नवी दिल्ली येथील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयास व मुंबई येथील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयास जोडण्यात आलेले असते. त्यामुळे येथील सांडपाण्याची गुणवत्ता ही सतत तपासली जाते. प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर सीपीयु - Condensate Polishing Unit मध्ये प्रक्रिया केल्यानंतर त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. |
| २) | विस्तारिकरण करताना परिसरातील झाडी वाढविणे / हरितपट्टा विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापनाने काही निर्णय घेतलेला आहे काय? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की, हा प्रश्न महत्वाचा आहे. प्रकल्पास सीएसआर व सीईआर निधी राखीव ठेवणे हे कायद्याने बंधनकारकच आहे. तर आजूबाजूच्या ५-६ गावात हरितपट्टा विकसित करण्याची योजना प्रकल्प प्रवर्तकांनी तयार केलेली आहे. तेथील ग्रामपंचायतीशी चर्चा करुनच तेथील पडीक जमिन, मोकळ्या जागा, शाळा, रुग्णालयाजवळील जागा येथे हरितपट्टा विकसित करण्यात येईल. त्याचे नियोजन करण्यात आलेले असून, हरितपट्टा |



रिमोरे

| | | |
|---|---|---|
| | | विकसनाचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. परिसरात ३,०००-३,५०० झाडे लावण्यात येणार आहे. |

३) **श्री. निलेश जालिंदर कापसे, मुक्काम पोस्ट-कापसेवाडी, तालुका-माढा, जिल्हा सोलापूरः-**

विस्तारिकरण प्रकल्पात जी वीजनिर्मिती होणार आहे, ती कुठे वापरण्यात येणार आहे? प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्पात वीजनिर्मिती युनिटला को-जन युनिट म्हटले जाते. नियमाप्रमाणे वीजनिर्मिती शासनाच्या कराराप्रमाणे करण्यात येते. त्यानुसार उत्पादित वीजेतील काही भाग हा कारखान्यात वापरुन उरलेला भाग हा शासनास म्हणजे महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीच्या पॉवर ग्रीडला पाठविला जातो. कारखान्यास येथील ग्राहकांना थेट (direct) वीज देता येत नाही. ती महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीच्या पॉवर ग्रीडलाच पाठवावी लागते.

४) **श्री. समाधान नाईकवाडे, मुक्काम पोस्ट-उंदरगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-**

प्रस्तावित प्रकल्पात किती गाळप होणार व किती साखर उत्पादन होणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सध्या ५,८१२.० गाळप करणार आहोत. तर सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे फक्त साखर निर्मिती हे नियोजन नाही. प्रसंगी साखरेचा रस थेट आम्ही आसवणी प्रकल्पातही वापरू. एक टन ऊसाचे गाळप केल्यास सुमारे ७०.० लीटर इथेनॉल मिळते. तरी त्यानुसार २००.० किलोलिटर प्रतिदिन उत्पादनासाठी साखरेचा रस थेट आसवणी प्रकल्पात वापरण्यात येऊ शकेल व उर्वरित साखरेच्या उत्पादनासाठी वापरण्यात येऊ शकेल.

५) **श्री. तानाजी धनाजी लांडगे, मुक्काम पोस्ट- मानेगाव, तालुका- माढा,जिल्हा-सोलापूरः-**

या प्रकल्पामुळे आसपासच्या गावांना काय फायदा होईल?

या प्रकल्पास कच्चा माल म्हणजे ऊस हा परिसरातील शेतक-यांकडूनच घेण्यात येईल. त्यामुळे शेतक-यांनी ऊसाचे जास्त उत्पादन घेण्यास कारखान्याकडून प्रोत्साहित करण्यात येईल. या प्रकल्पाचा प्रत्यक्ष फायदा म्हणजे प्रकल्पात रोजगाराची निर्मिती होईल. स्थानिकांनाच प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात येईल. साखर उदयोग हा फक्त साखरेच्या उत्पादनावर तगू शकत नाही. त्यासाठी उपपदार्थ इथेनॉल, कार्बन -डाय-ऑक्सईड, मोलॅसिस हे पदार्थ विकून फायदा करता येतो. प्रकल्पात उत्पन्न होणारे इथेनॉल भारत सरकार विकत घेते. उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे कार्बन -डाय-ऑक्सईड हे शीतपेये कंपन्यांना विकता येते. त्यामुळे ऊसाला जादा दर देणे कारखाना प्रशासनास शक्य होईल.

**६) श्री. संतोष अशोक मिरगणे, राहणार-केवड, तालुका- माढा, जिल्हा-सोलापूरः-**

विस्तारित प्रकल्पात घनकचरा निर्माण होईल काय व त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

प्रकल्पात घनकचरा निर्माण होणार. प्रकल्पात मुख्य घनकचरा म्हणजे प्रकल्प उत्पादनात होणारी राख. कार्यरत प्रकल्पातील बॉयलरमध्ये एक टन बगॅस जाळला तर ३% राख उत्पन्न होते. बगॅसमधील राख ही शेतीसाठी खत म्हणून उपलब्ध करुन देणार आहोत. स्पेंट व्रॉश जाळल्याने १७% राख तयार होते. ती कुठेही बाहेर न जाता दुसरी संस्था ती राख विकत घेऊन पोटॅश रिकव्हरीसाठी नेणार आहे. पोटॅश रिकव्हीनंतर ती राख खत म्हणून वापरण्यात येईल. त्याचप्रमाणे ईटीपी स्लज हा खत म्हणून उपलब्ध करण्यात येईल. ती पध्दत आतासुध्दा चालू आहे.

**७) श्री. सागर कौलगे, मुक्काम पोस्ट - अंजनगाव, तालुका - माढा, जिल्हा - सोलापूरः-**

विस्तारिकरणानंतर सहवीज निर्मिती प्रकल्प वर्षात किती दिवस कार्यरत राहिल?

प्रकल्पातील सहवीज निर्मिती प्रकल्पाचे विस्तारिकरण २५.० मेगा वॅटवरुन ६०.० मेगा वॅटपर्यंत करण्यात येणार आहे. साखर कारखाना हा १५०-१६० दिवस चालतो. नंतर उरलेल्या बगॅसचा विचार करुन सहवीज निर्मिती प्रकल्प हा साधारणतः सात महिने चालेल.

**८) श्री. सुधीर शहाजी धुमाळ, राहणार-तुर्कपिंपरी, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूर:-**

सांडपाण्याचा वापर शेतक-यांना करता येईल काय?

सांडपाण्याचा वापर नक्कीच शेतक-यांना करता येऊ शकतो. परंतु, प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी सीपीयुमध्ये प्रक्रिया केल्यानंतर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांप्रमाणे त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. त्यामुळे शेतक-यांना पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन होईल असे वाटत नाही.

**९) श्री. राजू शेळके, राहणार-तुर्कपिंपरी, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूर:-**

विस्तारिकरणानंतर होणा-या संभाव्य हवा प्रदूषण नियंत्रणासाठी काय संयत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे संभाव्य हवेच्या प्रदूषण नियंत्रणासाठी बॉयलरला ७० मीटर उंचीच्या चिमणीस ईएसपी (Electro-Static-Precipitator-ESP) हे अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल, जे ९९.९% कार्यक्षमता सिध्द करते. त्यामुळे धुरातील प्रदूषकांचा अटकाव होईल. त्यामुळे हवा प्रदूषणाचा धोका राहणार नाही.

**१०) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राहणार-तेलंगणा राज्य:-**

मी प्रकल्पाचे समर्थन करत असून प्रकल्प प्रशासनास प्रकल्प विस्तारिकरणासाठी शुभेच्छा देत आहे. त्याप्रमाणे मी कंपनीस धन्यवाद देतो की, कंपनीने सदरहू पर्यावरण सल्लागाराची पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी नेमणूक केली. मी पर्यावरण पर्यावरण सल्लागाराचे आभार मानतो की, त्यांनी योग्य प्रकारे सर्वेक्षण करुन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला. मी पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालयास सदरहू प्रकल्पास त्वरित मंजूरी देण्याची विनंती करतो.

सदरहू उद्योग हा "शेतकरी मित्र उद्योग" असल्याने एक व्यावहारिक पर्यावरणवादी म्हणून, मी पर्यावरण मंत्रालयाकडे मागणी करत आहे, जर शक्य असेल तर कृपया अशा

उद्योगांना जनसुनावणी प्रक्रियेतून सूट देण्यात यावी. कारण जाहिर जनसुनावणी घेणे ही मोठी प्रक्रिया असून त्यास २-३ वर्षे लागतात.

मी प्रकल्प प्रशासनास विनंती करतो की आपले ३३% हरितपट्टा विकास हा योग्य असून त्याचे स्वागत. मात्र्, येथे मी विनंती करतो की, हरित पट्टा विकसित करताना फळझडे व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात यावी. त्याचप्रमाणे हरितपट्टा विकसित करताना जपानी पध्दतीचे मियावाकी प्लॅनटेशन करण्यात यावे. त्यात एक एकरात चार हजारापेक्षा जास्त झाडे लावण्यात येतात. ते तुमच्या सीएसआर अंदाजपत्रकात करणे आपणास शक्य आहे.

त्याचप्रमाणे, जल संवर्धन करणे हे एक महत्त्वाचे आहे.

मी सीएसआर निधी योग्य प्रकारे खर्च करण्यासाठी गावचे सरपंच, व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांसह एक समन्वय समिती स्थापन करण्याची विनंती करत आहे. त्यांच्या सभेत "डिमांड ओरिएंटेड वर्क" घेण्यास मंजूरी देण्यात यावी. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनास विश्वासार्हता प्राप्त होईल.

मी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना प्रकल्पास बिनशर्त परवानगी प्रदान करण्याची विनंती करत आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री रेड्डी जे इंग्रजीत बोलले, त्यांचे मुद्दे मराठीत सांगीतले. श्री रेड्डी यांनी हरितपट्टा विकसित करताना मियावाकी प्लॅनटेशन करण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यानी सांगितले की, मियावाकी प्लॅनटेशनमध्ये आपल्याला प्लॅनटेशन करत येते व झाडांच्या प्रजातीस मर्यादा येतात.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की, श्री रेड्डी यांनी गावाचे सरपंच, व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांसह एक समन्वय समिती स्थापन करण्याची विनंती केलेली आहे. त्यांच्या सभेत "डिमांड ओरिएंटेड वर्क" घेण्यास मंजूरी देण्यात यावी. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनास विश्वासार्हता प्राप्त होईल. श्री रेड्डी यांनी प्रकल्पास शुभेच्छा दिलेल्या आहेत.

**११) श्री. अप्पासाहेब मिरगणे, मुक्काम पोस्ट -केवड, तालुका- माढा, जिल्हा- सोलापूरः-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना /प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | विस्तारिकरण प्रकल्पामुळे जे ध्वनि प्रदूषण होणार आहे, त्याबाबत काय उपाययोजना करणार आहात? | प्रकल्पात ध्वनि प्रदूषण हे एका उपक्रमामुळे (aspect) होत नाही, तर ते एकत्रित उपक्रमामुळे (aspect) होते. जेव्हा ब्रॉयलर, टर्बाईन, इतर मशिनरी कार्यरत असताना ध्वनि प्रदूषण होते. इंजिनियरिंग कंपनीप्रमाणे साखर उद्योगात ध्वनि प्रदूषण होत नाही. त्यामुळे प्रकल्पाबाहेरील परिसरास ध्वनीचा त्रास होणार नाही.<br><br>प्रकल्पात टर्बाईन एक बाजूला आहे, त्याला आवरण (कव्हर) आहे. त्याप्रमाणेच डी.जी. सेट वेगळ्या बंद खोलीत असणार आहे. प्रकल्पात ध्वनी प्रदूषण नियंत्रणाची पूर्ण काळजी घेण्यात येणार आहे. प्रकल्पात ध्वनि उत्पन्न करणा-या मशिनरीजवळ काम करणा-या कामगारांना ईअर मफ्स, ईअर प्लग्ज पुरविण्यात येतील.<br><br>प्रकल्पात हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे, त्यामुळे ध्वनीचा त्रास प्रकल्पाबाहेर होणार नाही. |
| 2) | प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या परिसरात विकासाच्या कोणत्या योजना राबविणार आहोत | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, ऊस उत्पादन वाढीबाबत आम्ही जास्त काम करणार आहोत. ऊसाच्या कुठल्या जातींची लागवड, कुठली खते देणे याबाबत कार्यशाळा, मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे खते व पाणीपुरवठा याबाबत जनजागृती करणार आहोत. ती प्रत्येक शेतकरी पातळीवर राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक शेतक-यांचे सबलीकरण करणे हेच आमचे ध्येय आहे. |

**१२) श्री. राजेन्द्र बाळू गुंड, मुक्काम पोस्ट -विठ्ठलवाडी, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर:-**



१५

विस्तारिकरणानंतर कारखान्यातून बाहेर पडणारे सांडपाणी, निर्माण होणारे ध्वनी, हवेचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कारखान्याम्रार्फत कोणती यंत्रणा राबविण्यात येणार आहे? कोणती संस्था त्याबाबत कार्यरत राहणार आहे?

उत्पादन प्रक्रियेतील प्रदूषण नियंत्रण करणे ही कारखान्याची जबाबदारी आहे. तर प्रदूषण पारित मानकांप्रमाणे आहे की नाही, यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सांडपाण्याची मानके क़डक केलेली आहेत. त्यानुसार साखर कारखाना व आसवणी प्रकल्प हा पूर्णपणे शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प राबविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर सीपीयुत प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेतच पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. प्रकल्पातील स्पेंट वॉश ही पूर्णपणे जाळून नष्ट करणार आहोत. प्रकल्पातून सांडपाण्याचा एकही थेंब कारखान्याबाहेर जाणार नाही.

**१३) श्री. उल्हास राऊत, राहणार - मानेगाव, तालुका- माढा,, जिल्हा-सोलापूरः-**

विस्तारिकरण प्रकल्पासाठी अंदाजे खर्च किती येईल?

विस्तारिकरण प्रकल्पासाठी अंदाजे ५२५ कोटी रुपये खर्च होईल.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप,टीकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**१४) श्री. भागवत सुनील तांबिले, राहणार- उंदरगाव, तालुका-माढा, जिल्हा- सोलापूर-**

| अ.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आपल्या कारखान्याची ईटीपी आणि हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची तपासणी करते काय? असल्यास ती किती दिवसांनी करते? | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची वरिष्ठ संस्था केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. त्यांच्या निर्देशांनुसार प्रकल्पात Online Continuous Monitoring System कार्यान्वित करण्यात आलेली आहे. ती नवी दिल्ली येथील केंद्रीय |

| | | |
|---|---|---|
| | | प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात व मुंबई येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला जोडलेली आहे. त्यामुळे प्रत्येक सेकंदाचा डेटा त्यांच्याकडे असतो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची यंत्रणा हंगाम चालू असताना महिन्यातून एकदा किंवा दोनदा जल व हवेचे नमुने घेऊन जातात व त्याचा अहवाल ते देत असतात. |
| २) | विस्तारिकरणामुळे रोजगाराची संधि निर्माण होतील काय? | पर्यावरण सल्लागार यांनी निश्चितच रोजगाराची संधि उपलब्ध होतील, असे सांगितले. सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे साधारणपणे ११५०--१२०० लोकांना रोजगाराची संधि मिळू शकते. प्रकल्पात कुशल, अर्धकुशल व अकुशल संवर्गातील व्यक्तींना रोजगाराची संधि मिळेल. |

**१५) श्री. ज्ञानेश्वर शेंडगे, मुक्काम पोस्ट- विठ्ठलवाडी, तालुका- माढा, जिल्हा- सोलापूरः-**

विस्तारिकरणामुळे ऊसाचे क्षेत्र वाढणार आहे. कर्मचा-यांची संख्याही वाढणार आहे. जर एखादा अपघात झाल्यास, आग लागल्यास त्यासाठी काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत?

एखादी आग, अपघात प्रसंग ही नैसर्गिक किंवा माणसाच्या निष्काळजीपणामुळेच होत असतो. त्यासाठी कारखान्यास Onsite Disaster Management Plan तयार करणे बंधनकारक असून तो तयार करण्यात आलेला आहे. शासनाच्या नियमांप्रमाणे अग्निरोधक यंत्रणा (Fire Fighting equipments) ही प्रकल्पात बसविण्यात येईल. त्याचप्रमाणे नागपूर येथील भारत सरकारच्या Explosive Department ची मान्यता घेणे व त्यांचे निर्देश पाळणे बंधनकारक आहे.

कारखाना चालू असताना अपघात झाल्यास काय करावे यासाठी महाराष्ट्र शासनाचे Directorate of Industrial Safety & Health (DISH) विभाग प्रकल्पातील कर्मचा-यांना प्रशिक्षण व रंगीत तालीम (mock drill) देत असते.

त्याचप्रमाणे Offsite Disaster Management Plan यंत्रणा ही जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली पूर्णवेळ कार्यरत असते. Onsite व Offsite Disaster Management Plan पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात संपूर्णपणे दिलेला आहे.

येथे परत सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप,टीकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**१६) श्री. दीपक देशमुख, राहणार-मानेगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-**

बॉयलरमधून राख उडते, ती दोन कि.मी. अंतरावर पसरते. ती पाण्यात, शेतावर पसरते. त्याचा काही दुष्परिणाम होईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, ते स्वतः पाहणी करत असताना राख पसरलेली दिसली. त्यासाठी अत्याधुनिक ईएसपी ही संयत्रणा कार्यान्वित केलेली असून ती तीन फिल्डवरुन सात फिल्डपर्यंत वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे उडणा-या धुलीकणांचा अटकाव होईल. त्याचा थेट (direct) परिणाम पिकांवर होत नाही.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याचे संधि दिली. त्यांनी उपस्थितांना टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

त्यावेळी सदस्य आयोजक यांनी सांगितले की, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने घेतलेली असून, त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येणार आहे. प्राप्त लेखी सूचना, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इतिवृत्त हे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व

शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त ०५ लेखी निवेदने/पत्रे/तक्रार अर्ज सोबत जोडलेली आहेत. व याबातचा तपशील खालीलप्रमाणे:-

१) चेंज मेकर्स रुरल एनवॉर्नमेंट डेव्हलॉपमेंट सोसायटी, आंध्र प्रदेश
२) फाईट अगेन्स्ट ग्लोबल वार्मींग, तेलंगना
३) धरणी एनवॉर्नमेंट सोसायटी, आंध्र प्रदेश
४) प्रगथी एनवॉर्नमेंट सोसायटी, तेलंगना
५) शक्ती एनवॉर्नमेंट रुरल डेव्हलॉपमेंट सोसायटी, अनंतपुरम

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थिगत करण्यात आली.

(निखिल जालिंदर मोरे)
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

(सौ. शमा पवार),
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
जिल्हा- सोलापूर